# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२१

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**नवी मुंबई नेरुळ नवी मुंबई विभागामध्ये ग्राहकांकडून होत असलेली विज चोरी**

**(१) १७३ (२८-०७-२०२०). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेरुळ नवी मुंबई विभागामध्ये वीज ग्राहकांकडून मीटरमध्ये फेरफार करु वीजचोरी करण्यात येत असल्याची बाब दिनांक २ जानेवारी, २०२० रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीज चोरी करणा-यांविरूध्द राज्यभर महावितरणाने सुरु केलेल्या विशेष मोहिम अंतर्गत भांडूप (मुंबई उपनगर) परिमंडळाच्या मुख्य अभियंता व वाशी मंडळाचे अधिक्षक अभियंता यांच्या आदेशानूसार नेरुळ (नवी मुंबई) विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी नेरुळ विभागामध्ये १९० वीज चोरीची प्रकरणे पकडली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, किती युनिटची वीज चोरी होत असल्याचे निष्पन्न झाले आहे व चोरीची वीज वापरणा-या ग्राहकांवर कोणती दंडात्मक कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. नितिन राऊत (२९-०१-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) महावितरण कंपनीमार्फत नेरुळ विभागामध्ये दिनांक ०१.११.२०१९ ते दिनांक ३१.१२.२०१९ या कालावधीत वीज चोरी विरुन मोहिम राबविण्यात आली. सदर मोहिमेत विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १३५ व १२६ नुसार १९० वीज ग्राहकांविरुध्द २.८८ लक्ष युनिट वीज चोरी प्रकरणी रु.५२.६६ लक्ष इतक्या रक्कमेची दंडात्मक कारवाई केलेली असून ९ ग्राहकांविरुध्द फौजदारी कारवाई केलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर येथील बुटीबोरी औद्योगिक क्षेत्रातील रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत**

**(२) २२५ (१२-०४-२०२०). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील बुटीबोरी औद्योगिक क्षेत्रातील रस्त्याची दुरवस्था झाली असल्याने या मार्गावर अपघात व जिवितहानी होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वेणा नदीवरील पुलाच्या मार्गाची दुरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रस्ते सुस्थितीत करणेबाबत तसेच यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२९-१२-२०२०) :** (१) सन २०१९ च्या पावसाळ्यामध्ये अतिवृष्टीमुळे सदर रस्त्यावर खड्डे पडले होते हे खरे आहे. तथापि माहे नोव्हेबर २०१९ मध्ये वा त्या सुमारास अपघाताने जिवितहानी झाल्याबाबतची कुठलीही घटना निदर्शनास आलेली नाही

(२) व (३) सन २०१९ च्या पावसाळ्यामध्ये अतिवृष्टीमुळे वेणा नदीच्या पुलावर काही ठिकाणी खड्डे पडले होते, माहे डिसेंबर २०१९ ते फेब्रुवारी २०२० मध्ये वेणा नदीवरील पुलाच्या मार्गाची दुरूस्ती करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**राज्यातील आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या विधवा महिलांना शासकीय योजनांचा लाभ देण्याबाबत**

**(३) ३४५ (०२-०४-२०२०). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या विधवा महिलांसाठी शासनाने महिला आयोगाच्या शिफारशी स्विकारून सदर महिलांना विविध शासकीय योजनांचा लाभ देण्याबाबतचा आदेश शासनाने काढला असल्याचे माहे जून २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आदेशानुसार शासनाने आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या किती विधवा महिलांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्याबाबत कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार (२७-०१-२०२१) :** (१) आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवांना विविध शासकीय योजनांचा लाभ देण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक १८ जून, २०१९ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

(२) राज्यातील आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या सुमारे ७१०३ विधवांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**येऊर (जि.ठाणे) परिसरात असलेल्या अनधिकृत हॉटेल आणि ढाब्यांबाबत**

**(४) ९३७ (०२-०४-२०२०). ॲड.राहुल नार्वेकर (कुलाबा), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येऊर (जि.ठाणे) परिसरात हॉटेल्स, ढाबे, हुक्का पार्लर आणि मद्यपींचा मध्यरात्रीपर्यंतचा वावर वाढल्यामुळे वन्यप्राण्यांच्या जीवाला धोका निर्माण होत असल्याची बाब माहे डिसेंबर २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने येऊरमधील वन्यजीवांचे संरक्षण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संजय राठोड (०५-०२-२०२१) :** (१) येऊर गाव हे राष्ट्रीय उद्‌यानाच्या आत वसलेले महसूल गाव असून त्याच्या भोवताली राखीव वन असून देखील येऊर गावाचा संजय गांधी राष्ट्रीय उद्‌यानात समावेश होत नाही. या गावामध्ये येण्या-जाण्यासाठी अस्तित्वात असलेला रस्ता येऊर परिक्षेत्राअंतर्गत संरक्षित वनातून जातो. सदर गावामध्ये उपहारगृह, हॉटेल, व्यवसायी तसेच रहिवाशी ठिकाणे आहेत. त्यामुळे येथे येणाऱ्या वाहनांची व याठिकाणी भेट देणाऱ्या पर्यटकांच्या वर्दळीमुळे येथील वन्यजीव अधिवासाला त्रास व अडथळा निर्माण होतो हे खरे आहे.

(२) व (३) रिट याचिका क्रमांक ८२३९/२०११ व ३५०७/२०११ मध्ये मा. उच्च न्यायालयाने पारित केलेल्या आदेशानसार येऊर येथील दोन हॉटेल मालक व त्यांचे कर्मचारी यांना रात्री ११.०० वाजेपर्यत ये-जा करण्यास परवानगी आहे. तसेच स्थानिक ग्रामस्थांची देखील ये-जा सुरु असते. यांचे व्यतिरीक्त इतर लोकांवर निर्बध घालण्यात आलेले आहे.

तसेच वन्यप्राण्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

- नियमित वनक्षेत्रात गस्त घालण्यात येते.
- वनक्षेत्रात चेकपोस्टची उभारणी करण्यात आली आहे.
- संरक्षित क्षेत्रातुन येऊर गावांत ये-जा करणाऱ्यांची नोंद करण्यात येते.
- आवश्यकतेनुसार संरक्षित क्षेत्रात व इतर ठिकाणी सी.सी. टिव्ही कॅमेरे बसविण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**हिंगोली जिल्हयातील शेतकऱ्यांना छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेतंर्गत कर्जमाफी मिळण्याबाबत**

**(५) १०७४ (०३-०४-२०२०). श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली), श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयातील ७४ हजार २८८ शेतकरी छत्रपती शिवाजी महाराज सन्मान योजनेतंर्गत कर्जमाफीसाठी पात्र ठरलेले असून त्यातील ४ हजार २८८ शेतकऱ्यांना अजुनही कर्जमाफीचा लाभ देण्यात आला नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हिंगोली तालुक्यात ५३६, वसमत तालुक्यात २२९, कळमनुरी तालुक्यात १०७८, औंढा नागनाथ तालुक्यात ११६ तर सेनगावं तालुक्यात ९२७ शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळाला नसल्याबाबतची तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने हिंगोली जिल्हयातील शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (१४-०१-२०२१) :** (१) नाही.

(२) अंशतः खरे आहे.

हिंगोली तालुक्यातील ५३६, वसमत तालुक्यातील २२८, कळमनुरी तालुक्यातील १०७८, औंढा नागनाथ तालुक्यातील ११६ व सेनगावं तालुक्यातील ९२७ शेतकऱ्यांच्या तक्रारी तालुका तक्रार निवारण समितीकडे प्राप्त झालेल्या आहेत.

(३) छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ अंतर्गत हिंगोली जिल्हयातील तालुका तक्रार निवारण समित्यांकडे एकुण २८८५ अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी २७२५अर्ज निकाली काढण्यात आले आहेत. उर्वरीत तक्रार अर्जावर आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच सदर योजनेअंतर्गत हिंगोली जिल्हयातील ९१,०३३ शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देण्यात आला असून उर्वरीत शेतकऱ्यांना लाभ देण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आदिवासी विकास महामंडळामार्फत होत असलेली पदभरती प्रक्रीया पुर्ण करण्याबाबत**

**(६) १३५४ (०२-०४-२०२०). श्री.टेकचंद सावरकर (कामठी), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विभागातील सुमारे ३७३ रिक्त पदांची भरती प्रक्रिया सन २०१४ मध्ये एका विशिष्ट यंत्रणेमार्फत राबविली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आजमितीस सुमारे ५ वर्षे उलटली तरी सदरहू भरती प्रक्रिया पूर्ण झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू भरती प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (१५-१२-२०२०) :** (१), (२), (३), (४) व (५) सन २०१४ मध्ये ३६१ पदांच्या भरती प्रकीया राबविण्यात आली होती. त्यासाठी मे. कुणाल आयटी सर्विसेस प्रा. लि., पुणे या संस्थेची नियुक्ती करण्यात आली होती. सदर भरती प्रक्रीयेसंदर्भात तक्रारी प्राप्त झाल्याने दि.२६.०४.२०१६ च्या पत्रान्वये विभागीय आयुक्त, नाशिक यांना सखोल चौकशी करण्याबाबत कळविण्यात आले. विभागीय आयुक्त, नाशिक यांनी दि.२५.०१.२०१७ रोजी सादर केलेल्या चौकशी अहवालामध्ये पदभरतीमध्ये अनियमितता झाली असल्याचे निदर्शनास आल्याने सदर भरती प्रक्रीया दि.१५.०५.२०२० रोजी रद्द करण्यात आली आहे.

---

### लोणार तालुका (जि. बुलढाणा) येथे ओला दुष्काळग्रस्त जाहिर करण्याची केलेली मागणी

**(७) १३६१ (०५-०४-२०२०). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोणार तालुका (जि. बुलढाणा) येथे ओला दुष्काळग्रस्त जाहिर करण्याची लेखी निवेदनाद्वारे तहसिलदार यांच्याकडे दि.२५ नोव्हेंबर, २०१९ रोजी च्या सुमारास राजकीय पक्षाच्या पदाधिकारी यांनी मागणी केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार (१९-०१-२०२१) :** (१) होय.

(२) माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर, २०१९ मध्ये “क्यार” व ”महा” या चक्रीवादळामुळे निर्माण झालेल्या अवेळी पावसामुळे लोणार तालुक्यातील शेतीपिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना रु. ३८,४५,२३,९५०/- इतक्या निधीचे वाटप करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### भंडारा जिल्हयात माकड व रानडुकरांकडून शेतीचे झालेले नुकसान

**(८) २१९४ (०५-०४-२०२०). श्री.राजू कारेमोरे (तुमसर), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्हयात मोठ्या प्रमाणात वनसंपदा असून वनसंपदेच्या नजीक असलेल्या शेतजमीनीवर माकड आणि रानडुकरांसारखे वन्यप्राणी मुक्तसंचार करत शेतपीकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान करीत असल्याचे माहे नोव्हेंबर २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वन्यप्राण्यांमुळे तुमसर मतदारसंघातील शेतावर काम करणाऱ्या शेतकऱ्यांवर हल्ला केल्याच्या घटना नेहमी घडत असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जंगलाशेजारी असलेल्या शेतात जाऊन धानपीकांचे नुकसान करणाऱ्या वन्यप्राण्यांना अटकाव करण्याकरिता जंगलाभोवती तारेचे कुंपण घालण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (१३-०१-२०२१) :** (१) माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान भंडारा वन विभागामध्ये रानडुक्करानी शेतपिकांचे नुकसान केल्याच्या घटना निदर्शनास आहेते तथापि माकडानी शेतपिकांचे नुकसान केल्याच्या घटना निदर्शनास आलेल्या नाहीत.

(२) सन २०१९-२०२० मध्ये तुमसर व मोहाडी तालुक्यामध्ये वन्यप्राण्यांच्या हल्यात मनुष्य जखमीच्या ८ घटना निदर्शनास आल्या असून प्रचलित शासन निर्णयातील तरतूदीनुसार संबंधित जखमी व्यक्तीस अर्थसहाय्य अदा करण्यात आले आहे.

(३) व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रात तसेच अभयारण्ये / राष्ट्रीय उद्याने यांच्या सिमेपासून ५ कि.मी. संवेदनशिल असलेल्या गावामध्ये वन्यप्राण्यांमुळे होणारे शेतपिकांचे नुकसान टाळण्यासाठी प्रयोगिक तत्वावर १० शेतकऱ्यांचा समुहासाठी ९०% शासकीय अनुदान व १०% वैयक्तिक अनुदानातून १ कि.मी. जाळीचे कुंपण (चेन लिंक फेन्सिंग) उभारण्याची योजना कार्यन्वीत करण्यात आली आहे. वनालगत गावांच्या वनसिमेवर प्रायोगिक तत्वावर वनविभागाद्वारे लोखंडी जाळीचे कुंपण उभारणे तसेच DPDC, व्याघ्र प्रकल्प प्रतिष्ठान योजनंतर्गत शेतकऱ्यांना अर्ज केल्यास त्यास वैयक्तिक व सामुहीक स्तरावर सौर कुंपन / चेनलिंग फेन्सीगकरीता उपलब्ध निधीच्या मर्यादेत वाटप करण्यात येते.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**कसारा (जि. नाशिक) परिसरात डोंगर खचल्याने घरांचे झालेले नुकसान .**

**(९) २२१० (०५-०४-२०२०). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील कसारा परिसरात डोंगर खचल्याने पंचशीलनगर, मिलिंदनगर येथील टेकडीवरील ५ घरांचे मोठे नुकसान झाले असल्याची बाब दिनांक १३ जुलै, २०१९ रोजी वा त्यासुमारास निर्दशनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने तात्काळ पंचनामे करुन बाधितांचे पुनर्वसन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार (०८-०२-२०२१) :** (१)सदर बाब ठाणे जिल्हयातील असून ती खरी आहे.

(२) शहापूर तालुक्यातील कसारा परिसरांत जुलै, २०१९ मध्ये डोंगर खचल्याने पंचशीलनगर, मिलिंदनगर येथील टेकडीवरील ५ घरांचे अंशत: नुकसान झाले असून शा.नि. सीएलएस-२०१७/प्र.क्र.२६७/म-३, दि. २५/०१/२०१८ अन्वये तहसिलदार शहापूर कार्यालयाने प्रत्येकी रु. ६०००/- प्रमाणे आर्थिक सहाय्य देण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उमरगा जि.उस्मानाबाद तालुक्यातील शेतकऱ्यांना दुष्काळी अनुदान न मिळाल्याबाबत**

**(१०) २४०१ (१९-०४-२०२०). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दुष्काळजन्य परिस्थितीमुळे शासनाकडून शेतकऱ्यांना सन २०१८ साली हेक्टरी १३,५०० रुपये दुष्काळ अनुदान जाहीर करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उमरगा, (जि.उस्मानाबाद) तालुका दुष्काळग्रस्त यादीत असूनही या तालुक्यातील एकाही शेतकऱ्याला अद्यापपर्यं अनुदान मिळालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उमरगा - लोहारा येथील लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १७ मे, २०१९ रोजी वा त्या सुमारास महसूलमंत्री, व पालक मंत्री, उस्मानाबाद यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास उस्मानाबाद जिल्ह्यात माहे ऑक्टोबर २०१९ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे खरीप हंगामातील पिकांचे नुकसान झाले असुन महसुल व कृषि विभागाच्या अधिकाऱ्यांमार्फत चुकीचे पंचनामे करण्यात आल्याने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना अनुदान व अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतक-यांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार (०५-०२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सन २०१८ च्या खरीप हंगामामध्ये राज्यातील दुष्काळ घोषित केलेल्या १५१ तालुक्यांमध्ये उमरगा तालुक्याचा समावेश नाही. तथापि, महसुल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक ८ जानेवारी, २०१९ अन्वये जून ते सप्टेंबर, २०१८ या कालावधीत झालेले एकूण पर्जन्यमान ७५० मि.मि. पेक्षा कमी असलेल्या महसुली मंडळातील अंतिम पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी आलेल्या ९३१ गावांमध्ये दुष्काळ सदृश्य परिस्थिती जाहीर करण्यात आली. यामध्ये उस्मानाबाद जिल्ह्यातील उमरगा तालुक्यातील उमरगा, मुरुम, नारंगवाडी, मुळज, दाळिंब या महसुली मंडळांतील ९६ गावांचा समावेश आहे. या दुष्काळ सदृश्य परिस्थिती जाहीर केलेल्या महसुल मंडळे व गावांमध्ये विविध उपाययोजना लागू करण्यात आल्या आहेत. या गावांमध्ये केंद्र शासनाच्या निकषानुसार व कार्यपद्धतीप्रमाणे दुष्काळ नसल्यामूळे शेतीपिकांच्या नुकसानासाठी राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून मदत देय नाही

(४) माहे ऑक्टोबर-नाव्हेंबर २०१९ मध्ये झालेल्या अवेळी पावसामूळे शेतीपिकांच्या नुकसानीच्या अनुषंगाने उस्मानाबाद जिल्ह्यातील ३९३९६७ शेतकऱ्यांना एकूण २८८१०.३२ लक्ष निधी वितरित करण्यात आला आहे.

(५) राज्यात खरीप २०१८ च्या हंगामात राज्यातील दुष्काळ घोषित केलेल्या २६८ महसुली मंडळे व दुष्काळ सदृश्य परिस्थिती घोषित केलेल्या ५४४९ गावांतील ३३% पेक्षा अधिक नुकसान झालेल्या बाधित शेतकऱ्यांना मदतीचे वाटप करण्याच्या अनुषंगाने रु २८५८.४० कोटी

इतका निधी उपलब्ध करून देण्याबाबत केंद्र शासनास दि. २१.११.२०१९ रोजी ज्ञापन पाठविण्यात आले होते. त्यावर राज्य शासनाकडून पाठविलेले दिनांक २१.११.२०१९ रोजीचे ज्ञापन "दुष्काळ व्यवस्थापन संहिता, २०१६" मधील बाबींची पूर्तता करत नसल्यामूळे, सदरचा प्रस्ताव अमान्य करण्यात आला असल्याचे केंद्र शासनाच्या कृषी मंत्रालयाने दि. २५.०२.२०२० च्या पत्रान्वये कळविले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही

---

**सिंधुदुर्ग जिल्हयातील मध्यम मुदत शेतीकर्ज व शेतीपुरक खावटी कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ मिळण्याबाबत**

**(११) ३०७६ (०३-०४-२०२०). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शेतकरी कर्जमाफी योजनेमध्ये फक्त अल्प मुदतीच्या कर्जमाफीचा समावेश असल्याने सिंधुदुर्ग जिल्हयातील सुमारे १२ हजार थकबाकीदार शेतकऱ्यांचे ५० कोटीचे कर्ज माफ होऊ शकते, मात्र मध्यम मुदत शेतीकर्ज व शेतीपुरक खावटी कर्ज घेतलेल्या १५ हजार शेतकऱ्यांचे ७० कोटी रुपयांच्या कर्जमुक्तीचा लाभ शेतकऱ्यांना मिळणार अशी प्राथमिक माहिती जिल्हा बँक व सहकार खात्याकडून शासनास उपलब्ध झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी सिंधुदुर्ग जिल्हयातील ९ हजार ५२६ सभासद शेतकऱ्यांकडे थकीत असलेल्या शेतपुरक खावटी कर्जाचा कर्जमुक्ती योजनेत समावेश करावा व दोन लाखांवरील कर्ज असलेल्या जिल्हयातील ३२३ शेतकऱ्यांना कर्ज मुक्तीचा लाभ मिळावा अश्या मागण्या निवेदनात केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (२२-०१-२०२१) :** (१) नाही.
(२) होय.
(३) सन २०१५-१६ ते सन २०१८-१९ या वर्षात नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या थकबाकीदार शेतकऱ्यांना कर्जाच्या दुष्टचक्रातून बाहेर काढण्यासाठी दिनांक २७.१२.२०१९ च्या शासन निर्णयान्वये "महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९" जाहीर करण्यात आली आहे.

या योजनेमध्ये अल्पमुदत पीक कर्जे व अल्पमुदत पीक कर्जाचे पुनर्गठन/फेरपुनर्गठन केलेले कर्जे याचाच समावेश आहे. अशा थकीत कर्जाची मुद्दल व व्याजासह रु. २.०० लाखापर्यंत असलेली रक्कम विचारात घेण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भोकरदन (जि.जालना) तालुक्यात अतिवृष्टीमुळे शेतकरी बांधवांच्या पशुधनाचे झालेले नुकसान**

**(१२) ५२५४ (१०-०४-२०२०). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोकरदन (जि.जालना) तालुक्यात माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या अतिवृष्टीमध्ये शेतकरी बांधवांच्या पशुधनाचे मोठया प्रमाणात नुकसान होऊन ११७ दुधाळ व इतर जनावरांचा मृत्यू झाल्याने नुकसान भरपाईसाठी सुमारे २२ लक्ष ९६ हजार रुपये निधीची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री, दुग्धविकास व पशुसंवर्धन मंत्री व जिल्हाधिकारी, जि.जालना यांच्याकडे माहे डिसेंबर २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याअनुषगांने भोकरदन तालुक्यातील पशुधनाचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

**श्री. विजय वडेट्टीवार (०५-०२-२०२१) :** (१) भोकरदन तालुक्यात नोव्हेंबर, २०१९ मध्ये नैसर्गिक आपत्तीमध्ये (वीज पडून/पुरात वाहून) एकही पशुधन मृत झालेली नाही. परंतु विषबाधा व निमोनिया रोगाची लागण होऊन ५८९ लहान दुधाळ जनावरे (मेंढया) मृत झालेली आहेत.

(२) व (३) नोव्हेंबर, २०१९ मध्ये भोकरदन तालुक्यात नैसर्गिक आपत्तीमुळे (वीजपडून/पुरात वाहून) एकही पशुधन मृत झाल्याचे आढळून आलेले नाही. त्यामुळे राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून आर्थिक मदत देण्याचा प्रश्न उद्भवला नाही.

---

**पाचोरा तालुक्यातील वन सीमेवर लोखंडी जाळीचे कुंपण उभारण्याबाबत**

**(१३) ५२६३ (०९-०४-२०२०). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या महसूल व वन विभागाने शासन निर्णय क्र. डब्ल्यूएलपी-०४१७/प्र.क्र.९१/ फ-१, दि.२९.८.२०१९ नुसार डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजनेअंतर्गत प्रायोगिक तत्वावर वनालगतच्या संवेदनशील गावाच्या वन सीमेवर लोखंडी जाळीचे कुंपण उभारण्याचा निर्णय घेतला हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शासन निर्णयानुसार पाचोरा तालुक्यातील आसनखेडा ख, आसनखेडा बु., नांद्रा, मोहाडी/पहाण/राणीचे बांबरुड व भडगावं गावातील पेंडगाव/ जुवार्डी/ पथराड/ आडळसे/ शिंदी/ शिवणी ही गावे वन सीमेवर असून या सीमेलगतच्या गावात बिबटया, निलगाय, रानडुक्कर, काळविट, तरस व हरण या वन्य प्राण्यांचा उपद्रव होत असून शेतपिकांचे नुकसान होवून नागरिकांच्या जिविताला धोका निर्माण होत आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त शासन निर्णयानुसार स्थानिक लोकप्रतिनिधीनी वांरवार शासनाकडे गावाच्या वन सीमेवर लोखंडी जाळीचे कुंपण उभारण्याबाबत मागणी केली आहे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (२०-०१-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) पाचोरा तालुक्यातील आसनखेडा खु., आसनखेडा बु., नांद्रा, मोहाडी, पहाण, राणीचे बांबरुड व भडगाव तालुक्यातील पेडगाव, जुवार्डी, पथराळ, आडळसे, शिंदी, शिवणी ह्या गावांचा पाचोरा वनक्षेत्रात तर भडगाव तालुक्यातील मौजे पेंडगावं जुवार्डी, पथराड, आडळसे, शिंदी, शिवणी या गावांचा चाळीसगांव वनक्षेत्रात समावेश होतो.

दिनांक ०१.०४.२०१७ ते ०५.०६.२०२० या कालावधीत वन्यप्राण्यांनी शेतपिकांचे नुकसान केल्याच्या ७०४ घटना निदर्शनास आल्या असून प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार रु. ३८,९१,७२८/- इतकी रक्कम संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यास अदा करण्यात आली आहे.
(३) हे खरे आहे.
(४) मौजे पहाण, नांद्रा, आसनखेडा, मोहाडी, बाबरुड या ५ गावांचा प्रस्ताव तयार करण्यात आला असून सदर अंदाजपत्रकास तांत्रिक मंजुरी प्रदान करण्यात आली असून प्रशासकीय मंजूरी प्राप्त होणे प्रतिक्षीत आहे.

पेडगाव, जुवार्डी, पथराड व आडवसे या गावांचा वनसिमेवर लोखंडी जाळी कुंपण उभारण्याच्या अंदाजपत्र तयार करण्यात आले असून त्यास तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी प्राप्त होणे प्रतिक्षीत आहे.
(५) प्रश्न उदभवत नाही.

---

## उस्मानाबाद जिल्हयात अनेक शेतकऱ्यांना राइट ऑफ लोन केल्याने पीक कर्ज व अन्य कर्ज मिळत नसल्याबाबत

**(१४) ५७४५ (०५-०४-२०२०). श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद जिल्हयातील आयसीआयसीआय बँक व देना बँक अशा अनेक बँकांनी शेतकऱ्यांना राइट ऑफ लोन केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी बँक निहाय व तालुका सविस्तर तपशील काय आहे,
(३) असल्यास, अशा कायम थकीत शेतकऱ्यांचे कर्ज अशा बँकांनी स्व-निधीतून भरून त्यांना राइट ऑफ लोन केल्याने असे शेतकरी अन्य कोणत्याच बँकेत कर्जासाठी पात्र ठरत नाहीत व अन्य बँक कसलेही कर्ज देत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अशा शेतकरी वर्गास नवीन पीक कर्ज व अन्य कर्ज उपलब्ध होण्यासाठी अशा बँकांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (१४-०१-२०२१) :** (१) अंशतः खरे आहे.
उस्मानाबाद जिल्हयातील कॅनरा बँक, स्टेट बँक ऑफ इंडिया व महाराष्ट्र ग्रामिण बँक या बँकांनी शेतकऱ्यांचे पीक कर्ज निर्लेखन केल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) बँक आणि त्यांनी निर्लेखीत केलेली खाते संख्या खालील प्रमाणे आहे.

अ.क्र. बँकेचे नाव निर्लेखीत खाते संख्या

१ कॅनरा बँक ५०७

२ स्टेट बँक ऑफ इंडिया २७२२

३ महाराष्ट्र ग्रामिण बँक २८४

तसेच उस्मानाबाद जिल्हयात कार्यरत असलेल्या बँकांपैकी बँक ऑफ बडोदा, युको बँक, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, आयडिबीआय, आयसीआयसीआय व युनियन बँक ऑफ इंडिया या बँकांनी कर्जे निर्लेखीत केली नाहीत.

(३) अंशतः खरेआहे.

काही बँका (उदा. स्टेट बँक ऑफ इंडिया) एका महिन्याच्या कालावधीनंतर परत शेतकऱ्यांस कर्जपुरवठा करतात. तथापी इतर बँका थकबाकी वसूल झाल्याशिवाय अशा शेतकऱ्यांस कर्ज पूरवठा करीत नाहीत.

(४) राज्यातील शेतक-यांना खरीप, २०२० च्या हंगामामध्ये बँकामार्फत पीक कर्ज उपलब्ध करुन देण्यासाठी शासनामार्फत दिनांक २१.०५.२०२० रोजीच्या राज्यस्तरीय खरीप आढावा सभेमध्ये, दिनांक २९.०५.२०२० रोजीच्या राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या विशेष सभेमध्ये, त्याचप्रमाणे दिनांक १७.०६.२०२० रोजीच्या मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेमध्ये बँकांना तसेच क्षेत्रीय अधिका-यांना आवश्यक कार्यवाहीच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**किन्हीज (ता. राळेगाव, जि. यवतमाळ) येथील आदिवासी आश्रम शाळेला क्रिडांगण विकास योजनेअंतर्गत मिळालेल्या निधीत झालेला गैरव्यवहार**

**(१५) ५७९७ (०५-०४-२०२०). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किन्हीज (ता. राळेगाव, जि. यवतमाळ) येथील शासकीय आदिवासी आश्रमशाळेला क्रिडांगण विकास योजनेअंतर्गत खेळाच्या क्रिडांगणाकरिता आदिवासी प्रकल्प कार्यालयामधून देण्यात आलेल्या निधीत गैरव्यवहार झाला असल्याची बाब दिनांक २ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली हे खरे आहे काय,

(२) असल्यास आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय पांढरकवडा येथुन जिल्हातील सर्व शासकीय आदिवासी आश्रमशाळेमध्ये खेळाचे क्रिडांगण तयार करण्याकरिता निधी देण्यात आला होता हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने संबधित दोषी अधिकारी व कंत्राटदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच शासकीय आदिवासी आश्रमशाळे मध्ये खेळाचे क्रिडांगण तयार करण्याकरिता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबांची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (०५-०२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

किन्ही (जवादे), ता.राळेगांव, जि.यवतमाळ या शासकीय आश्रमशाळेतील क्रिडांगणावर भांडारगृह बांधणे करिता सादर केलेल्या प्रस्तावानुसार जिल्हा क्रिडा अधिकारी, यवतमाळ यांना जिल्हा वार्षिक आदिवासी विकास उपयोजनेअंतर्गत क्रिडांगण विकास अनुदान योजनेमधून रु.७.०० लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सदरचे काम पूर्ण झाले आहे.

(२) होय.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पांढरकवडा या प्रकल्प कार्यालयांतर्गत एकूण १३ शासकीय आश्रमशाळांना क्रिडांगण विकास योजनेअंतर्गत क्रिडांगणावर भांडारगृहाचे बांधकाम करणे या प्रयोजनाकरिता प्रत्येकी रु.७.०० लक्ष याप्रमाणे एकूण रु.९१.०० लक्ष निधी प्रकल्प अधिकारी, पांढरकवडा यांच्यामार्फत मंजूर करण्यात आला आहे.

(३) उपरोक्त १३ आश्रमशाळांपैकी ७ आश्रमशाळांमधील भांडारगृहाचे बांधकाम पूर्ण झाले आहे. उर्वरित ६ आश्रमशाळांपैकी ३ आश्रमशाळांमधील भांडागरूहाचे काम प्रगतीपथावर आहे व २ आश्रमशाळांमधील कामास सुरुवात करण्यात येत आहे. शासकीय आश्रमशाळा हिवरी, ता.यवतमाळ येथील भांडारगृहाचे कामास तांत्रिक कारणामुळे सुरुवात करण्यात आलेली नाही. सबब, सदर प्रकरणी चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) क्रिडागंण विकास अनुदान योजने अंतर्गत प्रस्ताव प्राप्त करुन निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वाल्हे (ता.पुरंदर, जि.पुणे) येथे रोहित्रांतून वीज चोरी होत असल्याबाबत.**

**(१६) ६१७९ (२८-०७-२०२०). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाल्हे (ता.पुरंदर, जि.पुणे) परिसरातील गोपाळवस्ती, वाल्हे गावठाण, वाल्मिकी वस्ती येथे प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे वीजचोरी होत असल्याचे माहे डिसें.२०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले, चौकशीच्या अनुषंगाने वीज रोजी करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच, वीज चोराला आळा घालण्याच्या दृष्टिने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२९-०१-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही.

महावितरणच्या स्थानिक कार्यालय व भरारी पथक मार्फत वेळोवेळी वीज चोरी तपासणी मोहिम घेऊन वीजचोरी करणाऱ्या ग्राहकांविरुध्द विद्युत कायदा, २००३ अन्वये कारवाई करण्यात येत असते. सदर ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी केली असता वीज चोरी आढळून आलेली नाही.

(३) महावितरणच्या स्थानिक कार्यालय व भरारी पथकामार्फत वेळोवेळी वीज चोरी तपासणी मोहिम घेऊन वीज चोरी करणाऱ्या ग्राहकांविरुध्द विद्युत अधिनियम, २००३ मधील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राष्ट्रीय वन्यजीव मंडळ यांचेकडून देण्यात येणारे ना हरकत प्रमाणपत्र**

**(१७) ६९७० (०५-०४-२०२०). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय वन्यजीव मंडळ (NBWL) यांचेकडून येणा-या ना हरकत प्रमाणपत्र समस्येबाबत लोकप्रतिनिधी यांनी मा. मुख्यमंत्री यांना वांरवार लेखी निवेदने दिली असल्याचे बाब माहे मे, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सदर निवेदनानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (०५-०२-२०२१) :** (१) मा. सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका क्रमांक ४६०/२००४ मध्ये दिनांक ०४.१२.२००६ रोजी पारित केलेल्या आदेशान्वये अभयारण्यभोवती चे पर्यावरण संवदेनशील क्षेत्राची अंतिम अधिसूचना जारी होईपर्यत अभयारण्य भोवतीचे १० कि.मी. अंतरामध्ये येणाऱ्या क्षेत्रास मानीव पर्यावरण संवेदनशील क्षेत्र म्हणून गृहीत धरण्यात येईल असे नमूद आहे.

त्यानुसार राज्यातील सर्व संरक्षित क्षेत्राच्या सभोवताली पर्यावरण संवेदनशील क्षेत्रा अंमित होत नाही तोपर्यात विकास कामांसाठी विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन राष्ट्रीय वन्यजीव मंडळाची (NBWL) परवानगी घेणे आवश्यक आहे.

तसेच रिट याचिका क्रमांक २०२/१९९५ मध्ये दिनांक ११.१२.२०१८ रोजी पारित आदेशामध्ये देशातील २१ अभयारण्याचे पर्यावरण संवेदनशील क्षेत्राची अंतिम अधिसूचना न झाल्याबद्दल खेद व्यक्त करुन १० कि.मी. परिघातील पर्यावरण संवेदनशील क्षेत्र घोषित करण्याबाबत केंद्र शासनास निर्देश दिले आहेत. त्यानुसार महाराष्ट्रीतील ३ अभयारण्यांपैकी दिनांक १०.०५.२०१८ रोजी घोषित करण्यात आलेल्या ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्याचा त्यामध्ये समावेश आहे. सदर अभयारण्याच्या पर्यावरण संवेदनशील क्षेत्राबाबत व त्यामुळे विकास कामामध्ये येणाऱ्या अडचणींबाबत मे, २०१९ च्या दरम्यान वर्तमानपत्रात बातम्या प्रसिध्द झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) केंद्रीय पर्यावरण, वन व जलवायू परिवर्तन मंत्रालयामार्फत दिनांक ०६.११.२०१९ रोजी ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्या सभोवताली ० ते ३.५ किलो मिटरपर्यंतचे क्षेत्र संवेदनशील म्हणून जाहीर करण्याबाबत प्रारुप अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली आहे.

दिनांक ०४.०२.२०२० रोजी केंद्र शासन स्तरावर तज्ञ समितीची बैठक संपन्न झाली आहे. सदर समितीने सुचविलेल्या सुधारणानुसार सुधारीत प्रस्ताव तयार करुन केंद्र शासनास पाठविण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदर प्रस्तावास केंद्र शासनाची मंजूरी मिळेपर्यंत पर्यावरण संवेदनशील क्षेत्र १० कि.मी. पर्यंतच मान्यण्यात येते.

(३) प्रश्न उदभवत नाही.

---

**परांडा तालूक्यातील (जि.उस्मानाबाद)सोनारी गांवात माकडांचा होत असलेला मृत्यु**

**(१८) ७५३८ (०२-०४-२०२०). डॉ.तानाजी सावंत (परांडा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोनारी गांवातील (ता.परांडा, जि.उस्मानाबाद) येथील श्री काळ भैरवनाथ मंदीर परिसरात माकडे मृतावस्थेत आढळून आल्याचे दिनांक १७ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अचानक माकडे मृत पावल्यामुळे त्यांना संसर्ग झाला असल्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे स्थानिक नागरीकांच्या जिवीतालाही धोका पोहचू शकतो हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सदर मृत माकडे कोणत्या आजाराने दगावलेली आहेत याबाबत चौकशी करण्यांत आलेली आहे काय असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे.

(४) असल्यास, अश्या प्रकारची घटना पुन्हा होऊ नये व स्थानिक नागरीकांना याचा संसर्ग होऊ नये म्हणून शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (१३-०१-२०२१) :**(१) हे खरे आहे.

(२) व (३) प्रस्तुत प्रकणामधील २ माकडे Hemorrhagic Shock, २ माकडे Respiratory failure आणि १ माकडाचा मृत्यू Gastroenteritis या कारणामुळे झाला तर २ माकडांचे शरीर कुजल्यामुळे निश्चित कारण समजू शकले नसल्याचे पशुवैद्यकीय अधिकारी यांचे शवविच्छेदन अहवालात नमूद करण्यात आले आहे.

मृत माकडाच्या टिश्यु आणि पाण्याचे नमूने तपासणी केली असता त्यामध्ये E-coli हा जिवाणू आढळून आले आहेत.

सदर विषाणूचा संसर्ग दुषित पाण्यामुळे होतो सदर (विषाणू) मनुष्य व इतर प्राण्यांच्या आतड्यामध्ये आढळून येतेव त्यामुळे उल्टी, मुत्रपिंडाचे व इतर आजार होऊ शकतात.

(४) काळभैरवनाथ मंदिर संस्थानाचे पदाधिकारी व ग्राम पंचायत पदाधिकारींच्या सहभागाने मंदिर परिसर स्वच्छ करण्यात येवून कुंड्यातील दुषित पाणी काढून स्वच्छ पिण्याचे पाणीच्या कुंड्या ठेवण्यात आल्या आहे. तसेच याबाबत सदर क्षेत्रात जनजागृती अभियान राबविण्यात आले.

(५) प्रश्न उदभवत नाही.

---

## राज्यात मागील पाच वर्षात सामाजिक न्याय विभागाचा निधी अखर्चित राहिल्याबाबत

**(१९) ७५५८ (०५-०४-२०२०). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मागील ५ वर्षात सामाजिक न्याय विभागाला एकूण ३६ हजार ४६६ कोटीचा निधी मिळाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विभागाला मिळालेल्या निधी पैकी २२ हजार २६८ कोटी रुपये खर्च झाले आणि सुमारे १४ हजार १९८ कोटी रुपये अखर्चित राहिल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या धोरणानुसार अनूसूचीत जातीचा निधी हा त्या त्या वित्तीय वर्षात खर्च करण्याचे बंधनकारक असतांनाही सदरहू निधी हा खर्च न केल्याने अनूसूचीत जातीच्या लोकांना विकासापासून वंचित ठेवून त्यांच्यावर अन्याय केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू निधी अखर्चित राहण्याची कारणे काय आहेत व यास जबाबदार असणाऱ्या संबधितांविरुध्द शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (२८-०१-२०२१) :** (१) व (२) मागील ५ वर्षात (सन २०१४-१५ ते २०१८-१९) अनुसूचति जाती उपयोजनेतंर्गत रु.३६४१९.५१ कोटी इतका निधी मंजूर झाला होता. त्यापैकी रु.२४९९१.४१ कोटी इतका निधी खर्च झालेला आहे.

(३), (४) व (५) या विभागाकडून अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील वैयक्तिक लाभाच्या विविध योजना राबविण्यात येतात. तसेच इतर विभागांच्या वैयक्तिक लाभार्थ्यांच्या योजनेला अनुसूचित जाती व नवबौध्द लाभार्थ्यांसाठी अनुसूचित जाती घटक उपयोजनेतंर्गत निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. मात्र निधी खर्च करताना पात्र लाभार्थ्यांनाच दिला जाणे आवश्यक आहे. त्यासाठी आवश्यक विहित प्रक्रिया राबविताना निधी खर्च करण्यास मर्यादा येतात. आंध्रप्रदेश, कर्नाटक व ओरिसा या राज्याने सन २०१३ पासून अनुसूचित जाती उपयोजना व आदिवासी उपयोजनेचा कायदा केलेला आहे. सदरहू कायद्यांचा अभ्यास करुन महाराष्ट्र राज्यामध्ये अनुसूचित जाती उपयोजना कायदा करण्यासाठीच्या प्रस्तावावर वित्त विभाग, नियोजन विभाग व विधी व न्याय विभागाच्या अभिप्रायानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**नऱ्हे, (ता.हवेली, जि.पुणे) ग्रामपंचायत हद्दीतील वन विभागासह इतर शासकीय जमिनीवर अनधिकृत बांधकामे सुरु असल्याबाबत**

**(२०) ८८११ (१६-१०-२०२०). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नऱ्हे, (ता.हवेली, जि.पुणे) ग्रामपंचायत हद्दीतील वन विभागासह इतर शासकीय जमिनीवर वृक्षतोडी सह टेकड्या फोडून अनधिकृत बांधकामे सुरु असल्याबाबत माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मिळालेल्या माहितीनुसार ग्रामपंचायत नऱ्हे हद्दीमध्ये वन विभागासह इतर शासकीय जमिनीवरील टेकड्यांवर व टेकड्यांच्या उतारावर वृक्षतोडीसह होत असलेल्या अनधिकृत बांधकामांना संबंधित प्रशासनाच्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने होत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या भागात उंच सखल ठिकाणी होणाऱ्या वृक्षतोडीमुळे व चुकीच्या बांधकामांमुळे शेजारील इमारतीच्या खालचा भाग पोखरून कामे सुरु असल्याने परिसरातील इमारतींना धोका निर्माण झाला असल्याचे निदर्शनास येत असतांना वन विभाग, तहसीलदार, पीएमआरडीए प्रशासन कारवाई करत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (०४-०२-२०२१) :** (१) हे खरे नाही,

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मलकापूर नगर परिषद (जि.बुलडाणा) येथे दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत संरक्षण भिंत बांधकाम मंजूर करणेबाबत...**

**(२१) ९१९४ (०७-०६-२०२०). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर नगर परिषद (जि.बुलडाणा) अंतर्गत येणाऱ्या नळगंगा काठावरील दलित वस्तीमध्ये दरवर्षी पावसाचे व पुराचे पाणी शिरून जनजीवन विस्कळीत होऊन नागरिकांचे प्रचंड आर्थिक नुकसान होत असल्याची बाब दिनांक १० जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मलकापूर नगरपरिषद हद्दी अंतर्गत नळगंगा नदीच्या काठावरील रोहिदास नगर, ज्ञानेश्वर नगर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर, रमाबाई नगर पुलापर्यंत संरक्षण भिंत बांधकाम डॉ.बाबासाहेब आंबेडकर दलितवस्ती सुधार योजनेअंतर्गत करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे मार्च, २०२० मध्ये वा त्यादरम्यान मा.सामाजिक न्याय मंत्री यांना दिलेले निवेदन शासनास प्राप्त झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत उपरोक्त संरक्षण भिंत मंजूर करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (२१-०१-२०२१) :** (१) होय.
(२) होय. निवेदन प्राप्त झालेले आहे.
(३) दिनांक ३१ मार्च, २०२०नंतर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेंतर्गत नवीन कामे मंजूर करण्यात आलेली नाहीत.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**आंबीखालसा (ता.संगमनेर, जि.अहमदनगर) येथे बिबटयांचे होत असलेले हल्ले**

**(२२) ९६६९ (०४-०६-२०२०). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आंबीखालसा (ता.संगमनेर, जि.अहमदनगर) येथे बिबटयाने तीन नागरिकांवर दिनांक ११ मार्च, २०२० रोजी वा त्यासुमारास हल्ला केल्याची बाब निदर्शनास आली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यापूर्वीही दिनांक १५ सप्टेंबर २०१५, १ एप्रिल, २०१८ व १० मार्च २०२० या कालावधीत १५ हल्ले झाले असून ५ लोकांचा बळी गेला तर २० जण जखमी झाले तसेच दिनांक २० डिसेंबर २०१८ रोजी नगर तालुक्यात १८ कामगार जखमी व कुरामपूर येथे एक ९ वर्षाच्या मुलीचा मृत्यु झाल्याची घटना घडली हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, २०० पेक्षा अधिक बिबटे या भागात असल्याचा वनखात्याचा अंदाज असून, गेल्यावर्षी १०९१ जनावरांचा बळी घेतल्याचे निदर्शनास आले असतानाही वन विभाग त्याकडे दुर्लक्ष करीत आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, बिबटयांना जरेबंद करण्याची यंत्रणाच वन खात्याकडे उपलब्ध नसल्याने शेतकरी व जनावरांचे बळी जात आहेत हे खरे आहे काय,
(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीत काय आढळून आहे व त्यानुषंगाने बिबटयाचा बंदोबस्त करण्याच्या दृष्टीने तसेच मृत व्यक्तींच्या नातेवाईकांना नुकसानभरपाई देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. संजय राठोड (२८-०१-२०२१) :** (१) आंबीखालसा (ता. संगमनेर, जि. अहमदनगर) येथे दिनांक १२.०२.२०२० रोजी बिबट्याच्या हल्ल्यात एक महिला जखमी झाल्याची घटना निदर्शनास आली आहे.
(२) संगमनेर विभागात एप्रिल, २०१५ ते मार्च, २०२० या कालावधीत बिबट्याच्या हल्ल्यात मनुष्य जखमीच्या ६१ तर मनुष्य मृत्यूच्या ७ घटना निदर्शनास आल्या आहेत.
मौजे कुरणपुर, ता. श्रीरामपूर जि. अहमदनगर येथे दिनांक ०४.०९.२०१९ रोजी बिबट्याने हल्ल्यात करुन एका १० वर्षीय मुलाला जखमी केले. सदर मुलाला उपचाराकरीता रुग्णालयात दाखल केले असता उपचारा दरम्यान त्याचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.
(३) संगमनेर वन विभाग व अहमदनगर वन विभागामध्ये सन २०१९-२० मध्ये वन्यप्राण्यांच्या हल्ल्यामुळे पशुधन हानी झाल्याची १९५७ प्रकरणे निदर्शनास आली आहेत. सदर प्रकरण्यांमध्ये प्रचलित शासन निर्णयातील तरतूदीनुसार नुकसान ग्रस्त पशुधन मालकास रु. १,७१,२१,७५८/- इतकी नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे.

(४) हे खरे नाही.

संगमनेर व अकोले तालुक्यासाठी एक बचाव पथक (रेस्क्यु टीम) कार्यरत आहे. तसेच वनपरिक्षेत्रांसाठी चार गस्ती वाहने व बचाव पथकांसाठी एक पिकअप व्हॅन, केन, रेस्क्यु साहित्यासह एकूण २६ पिंजरे उपलब्ध आहेत.

(५) मानव वन्यप्राणी संघर्ष टाळण्याच्या अनुषंगाने क्षेत्रिय स्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

- वनक्षेत्रात तसेच वनक्षेत्राच्या जवळच्या भागामध्ये दिवस-रात्र गस्त घालण्यात येते.
- मानव व वन्यप्राणी यांचा संघर्ष कमी करण्याच्या दृष्टीने जनजागृती करण्यात येते.
- वन्यप्राण्यांना वनक्षेत्रात पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे याकरीता कृत्रिम पाणवठ्यांची निर्मिती करण्यात येते.
- वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या इसमाच्या वारसास तसेच पशुहानी झालेल्या लाभार्थ्यास प्रचलित शासन निर्णयातील तरतूदीनुसार तात्काळ नुकसान भरपाई अदा करण्यात येते.
- क्षेत्रिय अधिकारी / कर्मचाऱ्यांना मानव-वन्यप्राणी संघर्ष टाळण्याच्या दृष्टीने प्रशिक्षण देण्यात आले असून त्यांना ट्रॅन्क्युलायझर गन / ब्लो पाईप, ट्रॅप कॅमेरा, पिंजरे इत्यादी साहित्य उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.
- वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ चे कलम ११ (१) (a) मधील तरतुदीनुसार व केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेने नुसार मानवी जिवितास धोकादायक असलेल्या बिबट या वन्यप्राण्यांस जेरबंद करण्याची कार्यवाही करण्यात येते.

---

**जनता सहकारी बँक (जि. गोंदिया) या संस्थेत झालेला गैरव्यवहार**

**(२३) १०१४४ (०२-०६-२०२०). श्री.राजू कारेमोरे (तुमसर), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्हयातील जनता सहकारी बँक. या संस्थेच्या संचालक मंडळातील ६ सदस्यांनी व जनता सहकारी बँकेच्या पदाधिकाऱ्यांनी इतर संचालक मंडळातील सदस्यासह दिनांक १८ सप्टेंबर, २०१९ रोजी वा त्या सुमारास संगनमत करुन तसेच बेकायदेशीर निर्णय घेऊन केलेल्या अनियमिततेमुळे बँकेचे आर्थिक नुकसान झाल्याची तक्रार प्रधान सचिव, सहकार विभाग यांचेकडे केली असल्याचे निदर्शानास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त सहा संचालकांनी दिनांक १७ ऑगस्ट, २०१८ पासून विभागीय सह निबंधकाकडे सतत तक्रार करूनही गेल्या दोन वर्षापासून व सहकार खात्यानेही गेल्या १० महिन्यापासून आर्थिक अनियमितता व बेकायदेशीर झालेली नोकर भरती याबाबत कोणतीही कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जनता सहकारी बँक, गोंदिया येथील संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी बेकायदेशीररित्या कर्जवाटप केले असून ज्या सदस्य समितीने कर्ज वाटप केले आहे त्यांचेवर कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसून बँकेचे संचालक देखील दिनांक २३ सप्टेंबर, २०१९ पासून अनुपस्थित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली करुन संचालक मंडळ बरखास्त करून त्यावर प्रशासक नेमून संस्थेत बेकायदेशीररित्या गैरव्यवहार करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (२१-०१-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

बँकेच्या संचालक मंडळातील ३ सदस्यांनी बँकेतील होणाऱ्या अनियमीत कारभाराबाबतचा तक्रार अर्ज प्रधान सचिव, सहकार विभाग यांचेकडे सादर केला होता.

(२), (३) व (४)

सदर बँकेच्या संचालकाकडून प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने, विभागीय सहनिबंधक, नागपूर यांनी बँकेची चौकशी करण्यासाठी दि. २७.११.२०१९ रोजीच्या आदेशाने चौकशी अधिकाऱ्याची नियुक्ती केली. चौकशी अधिकारी यांनी सादर केलेल्या अहवालामध्ये बँकेने सहकार अधिनियम तसेच बँकेच्या मंजुर उपविधीतील तरतूदीचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आल्याने विभागीय सहनिबंधक, नागपूर यांनी दि. ०१.०७.२०२० रोजीच्या आदेशान्वये अधिनियम तसेच उपविधीतील तरतूदीनूसार कामकाज करणेबाबत अधिनियमाचे कलम ७९ अन्वये बँकेला वैधानिक निर्देश दिले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजे चिखलोली (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) येथे अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील मुलांसाठी शासकीय निवासी शाळा उभारण्याबाबत

**(२४) १०८८१ (०७-०६-२०२०). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे चिखलोली (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) येथे अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील दोनशे मुलांसाठी शासकीय निवासी शाळा उभारण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शासकीय निवासी शाळेच्या सुधारित अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १५ जानेवारी २०२० वा त्यासुमारास मा.सामाजिक न्याय मंत्री यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने उक्त ठिकाणी अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील मुलांसाठी शासकीय निवासी शाळा उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (०३-०२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे
(२) होय, हे खरे आहे,
(३) मौजे चिखलोली (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) येथे अनुसूचित जाती व नवबौध्द मुला-मुलींच्या २०० विद्यार्थी क्षमता असलेल्या शासकीय निवासी शाळेच्या प्रस्तावास विभागाच्या दि.११.८.२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता प्रदान करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सेलू (जि.परभणी) येथे महावितरणाकडून निविदा प्रकियेत होत असलेला गैरव्यहार**

**(२५) ११६४३ (१३-०९-२०२०). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेलू (जि.परभणी) तालुक्यात पूर्व मोसमी पावसासह वादळी वाऱ्यामुळे सेलू शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात अनेक ठिकाणी विजेचे खांब पडले असुन जीर्ण झालेल्या विजेच्या तारा अनेक ठिकाणी तुटल्याचे माहे जून २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी नागरिकांनी महावितरणाकडे तक्रार करुनही महावितरण याकडे दुर्लक्ष करित असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, किरकोळ दुरुस्तीसाठी महावितरणाकडून काढण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेमध्ये अधिकारी व ठेकेदार गैरव्यवहार करीत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२९-०१-२०२१) :** (१) पूर्व मोसमी व मोसमी वादळी पावसामुळे जून, २०२० या महिन्यात परभणी जिल्हयातील सेलू तालुक्यात उच्चदाब वाहिनीचे ४८, लघुदाब वाहिनीचे ८२ विजेचे खांब पडले होते. तसेच काही ठिकाणी विद्युत तारांवर झाडे पडल्यामुळे वीजेच्या तारा तुटून वीज पुरवठा खंडीत झाला होता.

(२) हे खरे नाही. सेलू तालुक्यात पाऊस व वादळामुळे पोल पडून वीज पुरवठा खंडीत झाला होता. या पावसामुळे अनेक ठिकाणी पाणी साचून चिखल झाला होता. महावितरण कंपनीमार्फत काम करणे शक्य असणाऱ्या ठिकाणी तातडीने काम करुन तेथील वीज पुरवठा त्वरीत सुरळीत करण्यात आला. तसेच काही शेती भागामध्ये काम करण्यायोग्य परिस्थिती झाल्याबरोबर पोल व तारा ओढून वीज पुरवठा दिनांक ०५.०७.२०२० रोजी सुरळीत करण्यात आला.

(३) हे खरे नाही. महावितरणकडून देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी सांघिक कार्यालयाच्या निर्देशानुसार व ठरवून दिलेल्या मार्गदर्शक प्रणालीनुसारच ई-निविदेद्वारे प्रतिबंधात्मक देखभाल/बिघाड दुरुस्ती देखभाल (Preventive Maintenance/Breakdown Maintenance) च्या कामासाठी एकूण तीन वर्षाच्या कालावधीकरिता जे ठेकेदार नियुक्त करण्यात आलेले आहेत, त्याच्यामार्फत कामे करण्यात येतात. त्याकरिता नवीन निविदा प्रक्रिया करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यबाबात

**(२६) ११७४० (०७-१०-२०२०). श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यात दि. २१ मे, २०२० रोजी वा त्या सुमारास वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे हिवरा, वरुड, डोंगरकडा या गावातील व परिसरातील शेतकऱ्यांचे व बागायतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधिनी तालुका कृषि अधिकारी, नायब तहसीलदार यांच्यासह दिनांक २२ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास नुकसानिची पाहणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नुकसानीचे तातडीने पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकरी, बागायतदार यांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. विजय वडेट्टीवार (१९-०१-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या निकषानुसार नुकसानीचे प्रमाण ३३% पेक्षा कमी असल्याने आर्थिक मदत अनुज्ञेय ठरत नाही.

---

## शाहुवाडी (जि.कोल्हापूर) तालुक्यांमध्ये जंगलालगतच्या भागात अनेक कंपन्यांकडून अवैध बॉक्साइट उत्खनन होत असल्याबाबत

**(२७) ११७७६ (१५-०९-२०२०). श्री.राजु (बाबा) जयवंतराव आवळे (हातकणंगले) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शाहुवाडी (जि.कोल्हापूर) तालुक्यांमध्ये सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या सीमा रेषेपासून पंचवीस किलोमीटरच्या परिसरात कोणतेही औद्योगिक प्रकल्प किंवा त्या अनुषंगाने कोणतेही काम करता येत नसतानाही जंगल लगतच्या भागात तीन ते चार कंपन्या बॉक्साइट उत्खनन करीत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास बॉक्साईड उत्खनना करीता सुरुंग लावण्यास वनखात्याने बंदी घातली असतानाही दररोज रात्रीच्या वेळेस सुरुंग लावले जात आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सुरुंगाच्या स्फोटामुळे भयभीत होऊन या भागातील बहुतेक वन्य प्राणी पक्षांनी पलायन केले आहे, तसेच एकीकडे केंद्र शासन सह्याद्री व्याघ्र प्रकल्प जोपासण्यासाठी आणि नावारुपाला आणण्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च करीत असून बॉक्साईड खाणीमुळे प्रकल्पाला अडचणीचे होत आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्या अनुषंगाने उत्खनन करणाऱ्या कंपन्यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संजय राठोड (१३-०१-२०२१) :** (१) रिट याचिका क्रमांक ४६०/२००४ मध्ये वन्यजीव अभयारण्य / राष्ट्रीय उद्यान/ व्याघ्र प्रकल्प क्षेत्रापासून १० कि.मी. हवाई अंतरामध्ये केंद्र शासन व राष्ट्रीय वन्यजीव मंडळ यांच्या पूर्वपरवानगी शिवाय औद्योगिक व खनिकर्म उद्योग उभारण्यात येवु नये असे आदेश मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ०४.१२.२००६ रोजी पारित केले आहेत.

कोल्हापूर जिल्हयातील शाहूवाडी तालुक्यामध्ये एकूण १२ खाणी मंजूर असून सह्याद्री व्याघ्र प्रकल्पापासून २५ ते ३० कि.मी. अंतर असलेल्या २ खाणी कार्यरत असून उर्वरित १० खाणी बंद करण्यात आलेल्या आहेत.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उदभवत नाही.

---

## आदिवासी विकास महामंडळामार्फत शहापूर येथे नियुक्त करण्यात आलेले गोदामपाल यांनी केलेला आर्थिक गैरव्यवहार

**(२८) ११९१३ (१४-०९-२०२०). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास महामंडळामार्फत शहापूर येथे नियुक्त करण्यात आलेले गोदामपाल यांनी चालू आर्थिक वर्षात भात खरेदी करताना आपल्या कार्यक्षेत्रातीलच भात खरेदी करण्याचे जिल्हाधिकारी यांचे स्पष्ट निर्देश असताना स्वत:च्या आर्थिक फायद्याकरिता जाणीवपूर्वक त्यांच्या केंद्राच्या कार्यक्षेत्राबाहेरील व्यापारी व शेतकऱ्यांकडून अनधिकृतरित्या भात खरेदी करून अपहार केल्याची बाब माहे मे-जुन, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली , हे खरे आहे काय,

(२) तसेच, सन २०१८-१९ मध्ये बेडीसगाव खरेदी केंद्रात भात खरेदी करताना शेतकऱ्यांकडून प्रत्यक्षात गोणीमध्ये ४१ किलो ५०० ग्राम भात घेत असताना शेतकऱ्यांना मात्र ४० किलोची पावती देणे, प्रत्येक काटयामागे शेतकऱ्यांकडून नियमबाहयरित्या ५ ते १० रूपयांची हमाली वसुल करणे, शेतकऱ्यांना गोण किंवा गोणीच्या किंमतीच्या रकमेचे कोणतेचे वाटप न करणे, खरेदी केलेला भात ठेवण्यास पर्याप्त जागा नसताना जास्तीच्या भाताची खरेदी करणे अशा अनेक तक्रारी स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांकडून शासनाकडे करण्यात आलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने दोषी गोदामपाल व इतर संबधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (०४-०२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

गोदामपाल, शहापूर यांनी उप प्रादेशिक कार्यालय, शहापूर अंतर्गत असलेले मढअंबर्जेच्या खरेदी केंद्राच्या कार्यक्षेत्रात शेतकऱ्यांकडून शासन निर्णयानुसार नमूद अटी-शर्तीनुसार आवश्यक कागदपत्रे ७/१२ उतारे, बँक पासबुक, आधारकार्ड घेऊनच १०१९ शेतकऱ्यांकडून वजन ३९०८५.२३ क्विंटल नुसार रक्कम रु.७०९३९६९२.४५ रकमेचा धान खरेदी केलेला आहे. मढअंबर्जेच्या खरेदी केंद्राच्या कार्यक्षेत्राबाहेरील, तसेच व्यापारांकडून धान खरेदी केलेला नाही.

(२), (३) व (४) अध्यक्ष, ठाणे जिल्हा बहुजन पत्रकार संघ यांनी दिनांक १६.०६.२०२० रोजी उप प्रादेशिक कार्यालय, शहापूर येथे भात खरेदीबाबत संबंधित गोदामपाल यांचेकडून अपहार झाल्याची तक्रार केली आहे. याबाबत चौकशी सुरु असून चौकशीअंती योग्य ती कार्यवाही करण्यांत येईल.

---

**हिंगोली जिल्हयातील लाभार्थ्यांना सौर कृषी पंप योजनेमधुन वीज जोडणी देण्याबाबत**

**(२९) ११९७९ (१३-०९-२०२०). श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयातील विविध शासकीय योजनेंतून दारिद्रय रेषेखालील मागासवर्गीय व सर्वसाधरण शेतकऱ्यांनी विहीर खोदल्या, मात्र त्यांना नवीन वीज जोडणी देण्यास महावितरण समोर अडचणी येत असल्याचे माहे डिसेंबर २०१९ च्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महावितरण लाभार्थ्यांची मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजनेत अर्ज करावा असे सांगितले जाते, मात्र काहींनी त्यात ही अर्ज करुन विविध कारणे सांगून ते फेटाळले गेले त्यामुळे सदर लाभार्थी अडचणीत आले हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने लाभार्थ्यांना सौर कृषी पंप योजनेमधून वीज जोडणी देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२५-०१-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) शेतक-यांना दिवसा सिंचनाची सोय उपलब्ध करुन देण्याच्या हेतूने शासनाद्वारे दि.१५.११.२०१८ व दि.११.०९.२०१९ च्या शासन निर्णयान्वये मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजना जाहीर केली आहे. सदर योजनेची अंमलबजावणी महावितरण कंपनीद्वारे करण्यात येत आहे.

हिंगोली जिल्हयात मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजनेंतर्गत आतापर्यंत १५०८६ एवढे अर्ज प्राप्त झालेले असून ५०२८ अर्ज मंजूर करण्यात आले आहेत. एकूण ९३९० अर्ज अयोग्य ७/१२, असंबंधित आधार कार्ड, पारंपारिक पध्दतीने कृषी पंपाला वीज पुरवठा, शाश्वत जलस्त्रोत उपलब्ध नसणे, भुजल सर्वेक्षण विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र सादर न करणे, सामुहिक प्रकरणात इतर भागीदार शेतकऱ्यांचे ना हरकत प्रमाणपत्र सादर न करणे, इ. कारणांमुळे अपात्र करण्यात आले. पात्र अर्जापैकी ३३७५ लाभार्थ्यांनी मागणी पत्राचा भरणा केलेला असून ३२८८ लाभार्थ्यांना पुरवठादाराची निवड केलेली आहे. त्यापैकी २१३७ सौर कृषीपंप आस्थापित करण्यात आलेले आहेत.

अर्ज अपात्र ठरविण्यात आलेल्या शेतकऱ्यांना एस.एम.एस व्दारे त्यांच्या अर्जातील त्रुटी दूर करण्याबाबत कळविण्यात आले आहे. टप्पा-२ व ३ करिता निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वनपरिक्षेत्र वरोरा अंतर्गत सालोरी गावातील वनामध्ये लागलेली आग**

**(३०) १२१८८ (२२-०९-२०२०). श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरोरा - चिमूर (जि.चंद्रपूर) मार्गालगत वनपरिक्षेत्र वरोरा तालुक्यातील सालोरी येथील रोपवनात आग लागून ५० हेक्टर वन जमिनीवरील रोपे जळून नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सालोरी वनपरिक्षेत्रात नाल्यावर विना परवानगी सिमेंट कांक्रीट बंधारा बांधण्यास सुरुवात करतांना केलेल्या खोदकामात अनेक झाडांची कत्तल करण्यात आल्याच्या तक्रारी करण्यात आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१९ मध्ये करण्यात आलेले रोपवन अचानक सन २०२० मध्ये पावसाळ्यापूर्वी आगीत भस्मसात होवून वाताहत झाल्याने याबाबतची सविस्तर चौकशी करण्याची मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सालोरी रोपवन आग प्रकरणात सविस्तर चौकशी होवून दोषींवर कारवाई करण्यात आली आहे काय, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संजय राठोड (०८-०२-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

चंद्रपूर विभागाअंतर्गत येत असलेल्या वनपरिक्षेत्र वरोरा येथील सालोरी येथे सन २०१९ चे पावसाळयात घेण्यात आलेल्या ५० हेक्टर मिश्र रोपवनाच्या बाजुच्या शेतात कचरा जाळण्यासाठी आग लागली असता, आगीचा डोंब रोपवनात येऊन दिनांक ३१.५.२०२० रोजी रोपवनातील २६.०६ हेक्टर क्षेत्रात आग पसरली. सदर आगीमध्ये रोपवनातील वाळलेले गवत व पालापाचोळा जळाले असून, त्यामध्ये रोपांना लाग लागून रोपांचे नुकसान झाले आहे.

(२) नाही.

तथापि, बामनडोह नाल्यालगत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून बंधारा बांधण्याकरीता ५०० चौ.कि.मी. जागा साफसफाई करुन खोदकाम केले आहे. परंतू सदर खोदकामामुळे वृक्षतोड झालेली नाही.

(३) सदर घटनेच्या संबंधात सहायक वनसंरक्षक (तेंदू), चंद्रपूर यांचेमार्फत चौकशी करण्यात आलेली आहे.

(४) सदर प्रकरणातील आग ही रोपवनालगत असलेल्या शेतातील कचरा जळत असलेल्या शेतकरी यांचेमुळे आग लागलेली असल्याने बिट वनरक्षक यांनी सदर महिलेविरुध्द भारतीय वन अधिनियम १९२७ अंतर्गत गुन्हा दाखल करुन मा.न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी न्यायालय, वरोरा यांचे न्यायालयात तक्रार दाखल केलेली आहे. सद्य:स्थितीत प्रकरण न्यायालयात सुरु आहे.

---

**हिंगोली जिल्ह्यातील दिग्रस (खु), सालापूर, दांडेगाव व परिसरातील अवकाळी पावसाने शेतक-यांचे झालेले नुकसान**

**(३१) १२२३७ (०७-१०-२०२०). श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यातील दिग्रस (खु), सालापूर, दांडेगाव व परिसरातील केळी व ऊसाच्या पिकांचे माहे जून, २०२० मध्ये झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नुकसानीचे पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यात आली आहे काय,

(३) अद्याप नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार (१९-०१-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) माहे जून ते ऑक्टोबर, २०२० या कालावधीत अतिवृष्टी व पुरामुळे नुकसान झालेल्या शेतीपिकांसाठी बाधित शेतकऱ्यांना आर्थिक मदत वाटप करण्यासाठी पहिला हप्ता रु. २२९७०६.३७ लक्ष इतका निधी दिनांक ९ नोव्हेंबर, २०२० रोजी वितरीत करण्यात आला असून हिंगोली जिल्हयाकरिता रू.११४९८.१२ लक्ष निधी देण्यात आला आहे.

---

**देगलूर व बिलोली (जि.नांदेड) तालुक्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याबाबत**

**(३२) १२२४३ (०७-१०-२०२०). श्री.रावसाहेब अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देगलूर व बिलोली (जि.नांदेड) तालुक्यात माहे एप्रिल -मे, २०२० महिन्याच्या सुमारास गारपीटीसह झालेल्या अवकाळी पावसाने मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांच्या रब्बी पिकांचे नुकसान झाले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनामार्फत पंचनामे करण्यात आले आहेत काय,

(३) असल्यास, उक्त नुकसानीचे पंचनामे करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विजय वडेट्टीवार (१९-०१-२०२१) :**

(१) अंशतः खरे आहे.

(२) व (३) माहे एप्रिल २०२० मधील अवेळी पाऊस / गारपीटीमुळे बिलोली तालुक्यातील १८०.७५ हेक्टर आर. क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झालेले आहे. मात्र देगलूर तालुक्यात पिक नुकसान झालेले नाही. त्याप्रमाणे माहे मे, २०२० मध्ये अवेळी पाऊस / गारपीटीमुळे बिलोली व देगलूर तालुक्यात पिक नुकसान झालेले नाही.

माहे मार्च ते मे, २०२० या कालावधीत अतिवृष्टी व गारपीटीमुळे नुकसानीबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडून शासनास प्राप्त झालेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ताडोबा (जि.चंद्रपुर) अभयारण्यातील १६० वाघांपैकी ५० वाघ इतर जिल्ह्यात स्थलांतरीत करण्याचा घेतलेला निर्णय**

**(३३) १२५११ (१५-०९-२०२०). श्री.मानसिंग नाईक (शिराळा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वन्यजीव-मानव संघर्ष कमी करण्यासाठी ताडोबा (जि.चंद्रपुर) अभयारण्यातील १६० वाघांपैकी ५० वाघ इतर जिल्ह्यात स्थलांतरीत करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतल्याची बाब माहे मे २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पर्यटनास चालना देण्याकरिता यामधील काही वाघ सह्याद्री व्याघ्र प्रकल्पामधील चांदोली अभयारण्यात (जि. सांगली ) सोडण्यात येणार आहेत हे ही खरे आहे काय ,
(३) असल्यास, संबंधित विभागाने तसा प्रस्ताव तयार करून शासनास सादर केला आहे वा करण्यात येणार आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री. संजय राठोड (१३-०१-२०२१) :** (१) व (२) चंद्रपूर जिल्ह्यातील वाघांच्या संख्येवर नियंत्रण ठेवणे व मानव-व्याघ्र संघर्ष कमी करण्याकरीता प्रस्तावित व्यवस्थापकीय हस्तक्षेपाबाबत बारकाईने पाहणी करण्याकरीता वन्यजीव व्यवस्थापन, वाघ संनियत्रण, स्थानिकांच्या उपजिविकेचे प्रश्न, सामाजिक व आर्थिक मुद्दे या विषयांशी संबंधित तज्ज्ञ व अशासकीय ११ सदस्यांचा समावेश असलेला तांत्रिक अभ्यासगट स्थापन करण्यात आला आहे.
सदर अभ्यास गट आपला अहवाल मुख्य वन्यजीव रक्षक तथा प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कडे सादर करेल. मुख्य वन्यजीव रक्षक तथा प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर हे त्यांचे स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अहवाल शासनास सादर करतील तद्‌नंतर चंद्रपूर जिल्ह्यातील वाघांचे स्थलांतरण व त्यांच्या संख्येवर संनियत्रणाच्या अनुषंगाने आवश्यक तो निर्णय घेण्यात येईल.
(३) प्रश्न उदभवत नाही.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**दिग्रस (जि.यवतमाळ) तालुक्यातील लायगव्हान येथील हरणाची झालेली शिकार**

**(३४) १२५३२ (१५-०९-२०२०). डॉ.संदीप धुर्वे (अर्णी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिग्रस (जि.यवतमाळ) तालुक्यातील लायगव्हान येथील हरीण शिकार प्रकरणात कर्तव्यात कसूर करणाऱ्या वनरक्षकाला निलंबित करण्यात आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास हरिणाची शिकार झाल्याचे वनपालास कळल्यानंतरही सात ते आठ दिवसानंतर चौकशी करुन कारवाई करण्यात आली असल्याने या प्रकरणात वनपालही जबाबदार आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वनपालाने कर्तव्यात कसूर केल्याने त्यांचेवरही कडक कारवाई करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच सदर घटना वनमंत्री असलेल्या तालुक्यातील असुन त्या मतदारसंघात शिकारीच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे त्यामुळे शिकारींवर आळा घालण्याकरिता कोणती उपाययोजना शासनाने केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संजय राठोड (२०-०१-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उदभवत नाही.

(४) मानव वन्यप्राणी संघर्ष टाळण्याच्या अनुषंगाने क्षेत्रिय स्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

• वनक्षेत्रात तसेच वनक्षेत्राच्या जवळच्या भागामध्ये दिवस-रात्र गस्त घालण्यात येते.

• मानव व वन्यप्राणी यांचा संघर्ष कमी करण्याच्या दृष्टीने जनजागृती करण्यात येते.

• वन्यप्राण्यांना वनक्षेत्रात पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे याकरीता कृत्रिम पाणवठ्यांची निर्मिती करण्यात येते.

• विभागीय स्थरावर Control Room ची स्थापन करुन २४ तास सेवा देण्यात येत आहे.

(५) प्रश्न उदभवत नाही.

---

**बेलवंडी, (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) येथील बिबट सफारी पार्कच्या प्रलंबित कामाबाबत**

**(३५) १३०७० (१३-०९-२०२०). श्री.बबनराव पाचपुते (श्रीगोंदा) : तारांकित प्रश्न क्रमांक ७३९४ ला दिनांक १२ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेलवंडी, (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) या ठिकाणी सन २००४ ते २००९ या कालावधीत राज्य शासनाच्या वनविभागामार्फत बिबट्या सफारी पार्क होणेसाठी परवानगी देण्यात आलेली होती हे खरे आहे काय,

(२) असल्यास या उक्त पार्कसाठी निधीची तरतूद करण्यात आली हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास सदर ठिकाणी निधी मंजूर झालेला असतानाही बिबट सफारी पार्कचे काम अदयापपर्यंत सुरु झाले नाही हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (२०-०१-२०२१) :** (१) हे खरे नाही.

मौजे बेलवंडी ता. श्रीगोंदा येथे बिबट निवारा केंद्र स्थापित करण्यासाठी केंद्रीय चिडीयाघर प्राधिकरण यांची काही अटींच्या अधिन राहून मंजूरी प्राप्त झालेली आहे.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## श्रीगोंदा (जि.अहमदनगर) तालुक्यातील अनेक गावामध्ये बिबटे मोठ्या प्रमाणात आढळून येत असल्याबाबत

**(३६) १३१०७ (१३-०९-२०२०). श्री.बबनराव पाचपुते (श्रीगोंदा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीगोंदा (जि.अहमदनगर) तालुक्यातील अनेक गावामध्ये बिबटे मोठ्या प्रमाणात आढळून आल्याने सदर भागातील नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाल्याचे माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत वन विभागास वारंवार तक्रार करुनही कोणती कार्यवाही केली नसल्याचे निदर्शनास आले हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बिबट्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (१३-०१-२०२१) :** (१) श्रीगोंदा (जि. अहमदनगर) तालुक्यातील ढवळगाव परिसरात घोडनदीकाठच्या गावांमध्ये ऊसाचे क्षेत्रात बिबटया या वन्यप्राण्यांचा वावर असल्याच्या घटना निदर्शनास आल्या आहेत.

(२) व (३) मानव-वन्यप्राणी संघर्ष कमी करण्याच्या दृष्टीने क्षेत्रिय स्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

- बिबट्याचा वावर असलेल्या क्षेत्रालगतच्या गावातील स्थानिकांमध्ये जनजागृती करुन सावधगिरीचे उपाय समजावून सांगितले जातात.
- बिबटयापासून सावधगिरीचे उपाय सांगणारे जनजागृती फलक व भिंतीपत्रके गावांमध्ये लावण्यात येताता.
- बिबटयाचा वावर असलेल्या क्षेत्रात क्षेत्रिय वनकर्मचारी / अधिकारी नियमीत गस्त करताता.
- मानव-वन्यप्राणी संघर्ष हाताळण्याच्या दृष्टीने क्षेत्रातील कर्मचारी व अधिकारी यांना प्रशिक्षण देण्यात येत.
- क्षेत्रिय कर्मचाऱ्यांना जसे टॅन्क्युलायजर गन, ब्लो पाईप, ट्रॅप कॅमेरा, पिंजरा ईत्यादी साहित्य उपलब्ध करुन देण्यात येते.
- वन्यप्राणी पाण्याच्या शोधात मानवी वस्तीकडे येऊ नये म्हणून वनक्षेत्रात वन्यप्राण्यांना पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे यासाठी पाणवठ्यांची निर्मिती करण्यात येते.
- मानवी जिवितास वन्यप्राण्यांकडून धोका असल्यास सदर वन्यप्राण्यांला वन्यजीव (संरक्षण), अधिनियम १९७२ चे कलम ११ नुसार जेरबंद/बेशुध्द करण्याची कार्यवाही करण्यात येते.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

### औरंगाबाद जिल्ह्यातील सिडको-जळगाव रस्त्यावर वृक्ष तोड होत असल्याबाबत

**(३७) १३१२५ (२२-०९-२०२०). श्री.प्रदीप जैस्वाल (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वृक्ष लागवड, संवर्धनासाठी लाखो रुपये खर्च करून हरितपट्टे विकसित केले जात आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास औरंगाबाद जिल्ह्यातील सिडको-जळगाव रस्त्यावर अनेक झाडांची तोड केली जात असल्याचे निदर्शनास आले आहे हे हि खरे आहे काय,

(३) असल्यास सदर प्रकरणाची चौकशी करून संबधित दोषींवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संजय राठोड (०८-०२-२०२१) :**१) होय,
वृक्ष लागवड व संवर्धनासाठी सातत्याने प्रयत्न सुरु आहेत.

(२) औरंगाबाद जळगांव रस्त्याचे रुंदीकरणात महानगर पालिका हद्दीबाहेरील बाधीत होणाऱ्या झाडांची वृक्षतोड करण्याकरीता कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग औरंगाबाद यांनी मागणी केल्यानुसार औरंगाबाद वन विभागाचे अखत्यारीत येत असलेल्या वन परिक्षेत्र अधिकारी औरंगाबाद, सिल्लोड, अंजिठा यांनी एकूण ६७८९ वृक्षतोडीस परवानगी दिलेली आहे. मात्र अवैध वृक्षतोड झालेली नाही.

(३) अवैध वृक्षतोड झालेली नसल्याने कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### जांभवली (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथे जमिन मालकांची परवानगी न घेता घाडीवाडी रस्ता तयार केल्याबाबत

**(३८) १३२०८ (११-०९-२०२०). श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जांभवली (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथे जमिन मालकांची परवानगी न घेता वरकस जमिनीच्या २०-२५ मीटर दगडी बांधाची नासधूस करून गटारे खोदून घाडीवाडी रस्ता तयार केल्याबाबत बाधित जमीन मालकांनी जिल्हाधिकारी (जि.रत्नागिरी), तहसीलदार (ता.राजापूर), वरिष्ठ पोलीस निरीक्षक (ता.राजापूर) यांना मेलद्वारे (ऑनलाईन) पाठवलेल्या निवेदनाद्वारे रस्त्याचे काम तात्काळ थांबवून भरपाई मिळण्याबाबत माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदरहू रस्ता बौध्दवाडीकरिता प्रस्तावित असतांना तो इतरत्र वळविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार तक्रारदारांस भरपाई देण्यासह रस्त्याचे बांधकाम थांबवून दोषी अधिकारी व कंत्राटदार यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (२१-०१-२०२१) :** (१) निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उदभवत नाही.

---

**निसर्ग वादळामुळे सातारा जिल्हयात साधनसंपत्तीचे कोटयवधी रुपयांचे झालेले नुकसान**

**(३९) १३२३४ (१३-०९-२०२०). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) तालुक्यामध्ये दिनांक ३ जुन, २०२० रोजी वा त्यासुमारास आलेल्या निसर्ग वादळ सातारा जिल्हयाकडे गेल्याने सातारा जिल्हयातील साधनसंपत्तीचे मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निसर्ग वादळामुळे जिल्हयातील ऊसाचे पिक, बागायती पिके, भाजीपाला तसेच १८५ घरांची पडझड झाली असल्याने त्यामध्ये ४ कोटीपेक्षा अधिक रक्कमेचे तसेच महावितरण कंपनीचे देखील स्थानिक पातळीवर १० लाख रुपये रक्कमेचे नुकसान झाले असल्याचे निदर्शनास आले आहे हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वादळामुळे सुमारे ३२ हेक्टर शेतीचे नुकसान झाले असताना शासनाने फक्त ४ हेक्टर ६४ गुंठे क्षेत्राचे पंचनामे केले असल्याचे दिनांक १७ जुन, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने निसर्ग वादळामुळे राज्यातील नुकसानग्रस्त क्षेत्रांचे तातडीने पंचनामे करुन नुकसानग्रस्तांना आर्थिक सहाय करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विजय वडेट्टीवार (०५-०२-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे,

(२), (३) व (४) निसर्ग चक्रीवादळामुळेपुणे विभागातील शेती पिकांचे, मृत पशुधन, मनुष्यहानी, घरपडझड, यांच्या नुकसानीसाठी ७८,२८,०८,०००/- इतक्या निधीचे वितरण दि.१५.०९.२०२० रोजी करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्हयात शासकीय हमी भाव केंद्र चालकांकडून शेतकऱ्यांची होत असलेली फसवणूक**

**(४०) १३३२७ (०२-१२-२०२०). श्री.बबनराव पाचपुते (श्रीगोंदा) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयात शासकीय हमी भाव केंद्र चालकांकडून शेतकऱ्यांची फसवणूक केली जात असल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त केंद्र चालकांकडून शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (०४-०२-२०२१) :** (१) व (२) कर्जत तालुक्यात नाफेडच्या वतीने पणन महासंघामार्फत हमी भावाने तूर व हरभरा खरेदीसाठी कर्जतकर फार्मर्स प्रोडयूसर कं.लि.कर्जत या संस्थेकडून खरेदी केंद्र सुरु करण्यात आले होते. श्री.महेंद्र बापू धांडे, धांडेवाडी जिल्हा अहमदनगर यांनी शासकीय हमी भाव केंद्रावर शेतकऱ्यांचा माल खरेदी करताना रुपये १/- याप्रमाणे पैसे घेतले जातात, अशी तक्रार करुन चौकशी करण्याची मागणी दिनांक १.७.२०२० च्या पत्रान्वये केली होती.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कर्जत यांनी दिनांक ७.७.२०२० च्या पत्रान्वये कर्जतकर फार्मर्स प्रोडयूसर कं.लि. कर्जत या संस्थेकडून स्वयंस्पष्ट लेखी खुलासा सादर करण्याचे सुचित केले होते. कर्जतकर फार्मर्स प्रोडयूसर कं. लि. कर्जत या संस्थेने तहसिलदार, कर्जत यांना खुलासा सादर करुन त्याची प्रत सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कर्जत यांना सादर केली आहे.
(३) हमी भावाने खरेदी योजनेंतर्गत एफएक्यु दर्जाचा शेतमाल खरेदी करणे संस्थेला बंधनकारक आहे. ज्या शेतकऱ्यांचा माल एफएक्यु दर्जाचा नाही, असे शेतकरी स्वेच्छेने संस्थेसमोरील एजन्सीमार्फत मालाचे ग्रेडींग व क्लिनिंग करुन घेतात. यासाठी शेतकऱ्यांसाठी रुपये १००/- प्रति क्विंटल याप्रमाणे बिलाची आकारणी केली जाते. सदर आकारणी अहमदनगर माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, यशाजंली सप्लायर्स अँड एन्टरप्रायझेस तसेच कर्जतकर फार्मर्स प्रोडयूसर कं. लि. कर्जत यांच्यामध्ये झालेल्या करारानुसार केली जाते. सदर खुलाश्यानंतर श्री. धांडे यांनी हमीभाव केंद्रावर प्रत्यक्ष पाहणी करुन व कंपनीचे कामकाज नियमानुसार चालू आहे, असे निदर्शनास आल्यानंतर आपला तक्रार अर्ज मागे घेतला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील आदिवासींना वनपट्ट्यांचे अधिकार बहाल करण्याबाबत**

**(४१) १३४८२ (२०-०९-२०२०). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या उक्त जमिन आदिवासींना देण्यात याव्यात अशा सूचना मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांनी माहे जून २०२० मध्ये वा त्यादरम्यान शासनास दिल्या आहेत, हे खरे आहे काय;
(२) असल्यास, सदरहू सूचनेच्या अनुषंगाने राज्यातील आदिवासींना वनपट्ट्यांचे अधिकार बहाल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (०४-०२-२०२१) :** (१) व (२)

मा. राज्यपाल महोदय यांच्या अध्यक्षतेखाली दि. ३ जुलै, २०२० रोजी वनहक्क कायदा अंमलबजावणीबाबत बैठक आयोजीत करण्यात आली होती. सदर बैठकीत मा.राज्यपाल महोदय यांनी प्रलंबित दाव्यांबाबत विचारणा केली असता जिल्हाधिकारी, पालघर यांनी पालघर जिल्ह्यातील प्रलंबित दावे हे पुढील ३ महिन्यात निकाली काढण्यात येतील असे सांगितले आहे.

पालघर जिल्ह्यात अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम २००६ व नियम २००८ तसेच सुधारित नियम २०१२ अंतर्गत पालघर जिल्ह्यामध्ये वैयक्तिक हक्कासाठी एकूण ६०३०४ दावे प्राप्त झाले असून त्यापैकी ४४३८४ दावे निकाली काढले आहेत.निकाली काढलेल्या दाव्यांपैकी ४४३८४ दावे मंजूर करण्यात आले असून त्यांचे एकूण क्षेत्र ५५९५८.१५ (एकर) इतक्या वन जमिनीचे दावेदारांना वनहक्क (टायटल डीडस) मंजूर करण्यात आले आहेत.

सद्य:स्थितीत पालघर जिल्हयामध्ये उपविभागस्तरीय समितीकडे १९२६ दावे प्रलंबित आहेत व जिल्हास्तरीय समितीकडे ७६९५ इतके दावे प्राप्त झालेले आहेत.असे एकूण ९६२१ दावे प्रलंबित आहेत. ७६९५ दाव्यापैकी १९३८ दावे मंजूर करण्यात आलेले असून उर्वरित दाव्यांवर पुढील कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सांगली जिल्हयात ज़िल्हा बँका व राष्ट्रीयकृत बँका शेतकऱ्यांना पीक कर्ज देण्यास टाळाटाळ करीत असल्याबाबत

**(४२) १३६०८ (१८-०९-२०२०). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयातील जिल्हा बँका व राष्ट्रीयकृत बँका शेतकऱ्यांना पीक कर्ज देण्यास टाळाटाळ करीत असल्याचे माहे जून २०२० वा त्यादरम्यान मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने शेतकऱ्यांना नवीन पीककर्ज देण्याबाबतचे आदेश दिलेले असतानाही सांगली जिल्हयातील सर्वच बँका शासनाचे आदेश डावलत असून शेतकऱ्यांना नवीन पीककर्ज देण्यास नकार देत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शेतकरी संघटनेने जिल्हा उपनिबंधकाकडे तक्रारी केली आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (२२-०१-२०२१) :** (१) व (२) नाही.

(३) व (४) होय.

स्वतंत्र भारत पक्ष शेतकरी संघटना यांचेकडून दिनांक ०५.०६.२०२० रोजी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सांगली यांना निवेदन प्राप्त झाले होते. सदर निवेदनामध्ये कुठल्याही बँकेचा किंवा शाखेचा किंवा शेतकऱ्यांचा उल्लेख केलेला नव्हता. तथापी सदर निवेदनातील तक्रारीच्या अनुषंगाने, सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व राष्ट्रीयकृत बँकांना कर्जवाटप करण्याबाबत जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सांगली यांचे स्तरावरुन निर्देश देण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील निसर्ग चक्रीवादळामध्ये झालेल्या नुकसानीबाबत

**(४३) १३६१० (१५-०९-२०२०). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील माहे जून २०२० मध्ये निसर्ग चक्रीवादळामध्ये नुकसान झालेल्या २२ गावातील सुमारे १३१ घरांचे पंचनामे करुनही आजतागायत नुकसानग्रस्तांना नुकसान भरपाई दिलेली नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने निसर्गचक्री वादळाच्या तडाख्यात नुकसान झालेल्या नुकसानग्रस्तांना मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विजय वडेट्टीवार (०५-०२-२०२१) :** (१) होय,

(२), (३) निसर्ग चक्रीवादळामुळे घरपडीमुळे नुकसान झालेल्या घरांचे पंचनामे झालेले असून बाधित नागरीकांना निकषानुसार मदत निधी देण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खानापूर (जि. सांगली) तालुक्यातील लेंगरे,ऐनवाडी,पोसेवाडी व अन्य गावातील घर मालकांना वनविभागाकडून निष्कासित करण्याचा नोटीसा पाठविल्याबाबत

**(४४) १३६१६ (१५-०९-२०२०). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खानापूर (जि.सांगली) तालुक्यातील लेंगरे, ऐनवाडी,पोसेवाडी व अन्य गावातील ग्रामस्थांची घरे वन विभागाच्या हद्दीत येत असल्याने निष्कासित करण्याबाबत वनविभागाकडून ग्रामस्थांना नोटीसा पाठवण्यात आल्याचे माहे जून २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वन विभागाच्या हद्दीत गेल्या शंभर वर्षांपासून वसलेल्या घरांना निष्कासित करण्याबाबतच्या नोटीसा काढण्यामागची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बेघर होणाऱ्या ग्रामस्थांना न्याय देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४). नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (०४-०२-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही.

तथापि, तासगांव वनपरिक्षेत्रातील पेड, डोंगरसोनी, नेहरुनगर, निमणी या गावातील वन जमिनीवर बांधकाम केलेल्या अतिक्रमणधारकांना वन जमिनीवर केलेले अतिक्रमण काढून टाकण्याबाबत वन परिक्षेत्र अधिकारी, तासगांव यांच्याव्दारे माहे, ऑगस्ट व माहे सप्टेंबर, २०२० या कालावधीमध्ये नोटीसा जारी करण्यात आलेल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आदिवासी महामंडळातील २०१६ मधील वादग्रस्त नोकरभरती बाबत**

**(४५) १३६७५ (१५-०९-२०२०). श्री.श्रीनिवास वनगा (पालघर), श्री.शिरीष चौधरी (रावेर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी महामंडळातील सन २०१६ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आलेल्या नोकरभरतीत तीनशे कोटी रुपयांच्या गैरव्यवहारामुळे राज्यभर गाजलेल्या आदिवासी विकास महामंडळातील वादग्रस्त नोकरभरती प्रक्रिया अखेर आदिवासी विभागाने दि.३० जुन, २०२० वा त्यासुमारास रद्द केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास आदिवासी महामंडळातील या भरतीप्रक्रियेत अनियमितता झाल्याचा अहवाल श्री.एकनाथ डवले चौकशी समितीने दिला असून त्या आधारे भरती प्रक्रिया रद् करण्याचे आदेश विभागाला दिले आहेत, हे हि खरे आहे काय,
(३) असल्यास, चौकशी अहवालावरून काय निष्पन्न झाले वा त्या अनुषंगाने दोषी आढळून आलेल्या सबंधित अधिकारी यांच्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**ॲड. के.सी.पाडवी (१५-१२-२०२०) :** (१), (२), (३) व (४)
सन २०१४ मध्ये ३६१ पदांच्या भरती प्रकीया राबविण्यात आली होती. त्यासाठी मे. कुणाल आयटी सर्विसेस प्रा. लि., पुणे या संस्थेची नियुक्ती करण्यात आली होती. सदर भरती प्रक्रीयेसंदर्भात तक्रारी प्राप्त झाल्याने दि.२६.०४.२०१६ च्या पत्रान्वये विभागीय आयुक्त, नाशिक यांना सखोल चौकशी करण्याबाबत कळविण्यात आले. विभागीय आयुक्त, नाशिक यांनी दि.२५.०१.२०१७ रोजी सादर केलेल्या चौकशी अहवालामध्ये पदभरतीमध्ये अनियमितता झाली असल्याचे निदर्शनास आल्याने सदर भरती प्रक्रीया दि.१५.०५.२०२० रोजी रद्द करण्यात आली आहे. तसेच संबंधित कंपनी व अधिकाऱ्यांवर FIR दाखल करून सखोल चौकशी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

---

## मुंबई मध्ये वीज ग्राहकांना वीज देयक हप्त्याने भरणा करण्याची महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने दिलेली मुभा

**(४६) १३८७८ (२०-०९-२०२०). श्री.अबू आजमी (मानखुर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई व मुंबई उपनगरामध्ये माहे, जून २०२० मध्ये वा त्यादरम्यान अवाजवी वीज देयक आलेल्या ग्राहकांना हप्त्याने भरणा करण्याची मुभा महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने दिली आहे हे खरे आहे काय,

(२) तसेच हप्ताने भरणा करतांना थकीत असलेल्या देयकावर ग्राहकांना व्याज द्यावे लागणार असल्याची बाब दिनांक ६ जुलै, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, अदानी वीज मंडळाकडून ९ टक्के तर बेस्ट वीज मंडळाकडून १२ टक्के व्याज आकारणी करणार असल्याने नागरिकांमध्ये असंतोषाचे वातावरण पसरले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन व्याज आकारणी न करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. नितिन राऊत (२८-०१-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने दिनांक २९ जून, २०२० च्या प्रसिध्दी पत्रान्वये जेथे वीज देयक माहे मार्च ते मे या कालावधीसाठी सरासरी देयकाच्या दुप्पट आहे अशा ग्राहकांना तीन हप्त्यात वीज देयक भरण्याचा पर्याय दिला होता.

(२) होय, हे खरे आहे,

काही प्रसिध्दी माध्यमांनी अशा प्रकारची बातमी प्रसिध्द केली होती.

(३) अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने वीज वितरण परवाना धारक कंपन्यांना आपल्या स्वत:च्या निधीतून सूट देण्याची मुभा दिल्यामुळे महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित, अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड व टाटा पॉवर कंपनी लिमिटेड या तीन वीज वितरण कंपन्यांनी थकीत वीज देयकाचा भरणा करणाऱ्या ग्राहकांना विलंब आकार अथवा व्याजाची आकारणी केली नाही.

बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम (बेस्ट) या वीज वितरण कंपनीने त्यांच्या ग्राहकास व्याजाच्या बाबतीत सूट दिलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

## समाजकल्याण विभागाकडे विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचे ४ लाख अर्ज प्रलंबित असल्याबाबत

**(४७) १३९२२ (१६-१०-२०२०). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मिळणारी शिष्यवृत्तीच्या लाभाची रक्कम थेट त्यांच्या खात्यात जमा होण्याच्या दृष्टीने डीबीटी पोर्टल सुरु करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून तद्नुषंगाने राज्यातील शैक्षणिक संस्थांमध्ये विविध अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या ५ लाख ७२ हजार विद्यार्थ्यांनी विहित मुदतीत शिष्यवृत्तीसाठी शासनाकडे अर्ज केल्याचे दिनांक ३ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त ५ लाख ७२ हजार अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांपैकी केवळ १ हजार २४३ विद्यार्थ्यांच्या खात्यावरच शिष्यवृत्तीची रक्कम जमा झाली झाली असल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उर्वरीत विद्यार्थ्यांच्या खात्यात शिष्यवृत्तीची रक्कम जमा न होण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने शिष्यवृत्ती पासून वंचित असलेल्या विद्यार्थ्यांच्या खात्यावर तात्काळ शिष्यवृत्तीची रक्कम जमा करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. धनंजय मुंडे (१३-०१-२०२१) :** (१) अंशत खरे आहे , सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे ऑनलाईन नोंदणी झालेले अर्ज ४,९५,४१६ इतके आहेत.त्यापैकी ३,८२,४४८ अर्ज मंजूर करण्यात आले असून त्यापैकी ३,८०,९१७ अर्जाचे रूपये ११३७.७७ कोटी या रकमेची देयके प्रणालीव्दारे तयार करण्यात आलेली आहेत.

(२) हे खरे नाही. शैक्षणीक वर्ष २०१९-२० या वर्षामध्ये दिनांक १ एप्रील,२०२० पर्यंत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती व फ्रिशिप प्रतिपूर्ती योजनेअंतर्गत नोंदणीकृत झालेल्या अनुसुचित जातीच्या अर्जापैकी ३ लाख ८० हजार ९१७ अर्जाचे ११३७.७७ कोटी या रकमेच्या देयकापैकी १,६७,८४१ अर्जाचे एकुण रूपये २७७.६९ कोटी एवढी रक्कम संबंधीत विद्यार्थी व महाविद्यालयाच्या आधार संलग्नीत बॅक खात्यात प्रणालीव्दारे वितरीत झालेले आहेत. तसेच दिनांक २२.११.२०२० च्या अद्ययावत आकडेवारीनुसार ३,०३,४५५ अर्जाचे एकूण रूपये ११०१.२४ कोटी एवढी रक्कम संबंधीत विद्यार्थी व महाविद्यालयाच्या आधार संलग्नीत बॅक खात्यात प्रणालीव्दारे वितरीत करण्याची प्रक्रिया पुर्ण झालेली आहे.

(३) उर्वरीत विद्यार्थ्यांच्या खात्यात शिष्यवृत्तीची रक्कम जमा न होण्याची कारणे पुढीलप्रमाणे आहेत,

विद्यार्थ्यांचे आधारक्रमांक अद्ययावत नसणे

विद्यार्थ्यांचे आधारकार्ड नॉनअॅक्टीव असणे

विद्यार्थ्यांनी रिडीम बटन न दाबणे

आधारकार्ड बँकेला संलग्न नसणे

आधार संलग्न फोन बंद असणे

दुस-या हप्त्यासाठी अर्ज महाविद्यालय स्तरावर प्रलंबीत असणे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही

(५) प्रश्न उद्‌भवत नाही

**पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यात वादळी वाऱ्यासह झालेल्या गारपीटीमुळे द्राक्षांच्या बागांचे झालेले नुकसान**

**(४८) १३९२४ (०७-१०-२०२०). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यात वादळी वाऱ्यासह झालेल्या गारपीटीमुळे सुमारे ५० हेक्टरहून अधिक क्षेत्रावरील द्राक्षांच्या बागांचे कोट्यावधी रुपयांचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अवकाळी पावसामध्ये कासेगांव, लक्ष्मी टाकळी, खर्डी, कोर्टी येथील शेतकऱ्यांच्या द्राक्ष बागांचे प्रचंड नुकसान होवून याबाबतच्या प्राथमिक अहवालात सुमारे १०० ते १५० एकर क्षेत्रावरील फळबागांचे नुकसान झाल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने तात्काळ पंचनामे करून संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. विजय वडेट्टीवार (१९-०१-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कामाच्या ठिकाणी होणाऱ्या महिलांच्या लैंगिक छळवणूकी संदर्भातील समितीबाबत...**

**(४९) १४०२० (१९-०९-२०२०). श्री.फारूक शाह (धुळे शहर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कामाच्या ठिकाणी होणाऱ्या महिलांच्या लैंगिक छळवणुकीच्या तक्रारी संदर्भात कामगार आयुक्त कार्यालयात समिती गठीत करण्यात आलेली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी समितीस मागील एक वर्षापासून तक्रार प्राप्त होऊन देखील त्याची सुनावणी घेण्यास टाळाटाळ करीत असून, समितीने वार्षिक अहवाल देखील सादर केला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने कायद्यातील नमूद तरतुदी लक्षात घेता संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (०१-०१-२०२१) :** (१) होय,खरे आहे.

(२) व (३) कामगार आयुक्त कार्यालयातील समितीस जानेवारी २०१९ ते डिसेंबर २०२० या कालावधीत एक तक्रार दि.०५/०३/२०१९ रोजी प्राप्त झालेली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने समितीने दि.२०/०३/२०१९, दि.२२/०४/२०१९, दि.२७/११/२०१९ व दि.११/११/२०२० रोजी सुनावणी घेतलेली आहे. समितीने दि.११/११/२०२० रोजी अंतिम सुनावणी घेतलेली असुन

दि.१७/११/२०२० रोजी कामगार आयुक्त यांना चौकशी अहवाल कामगार आयुक्त यांना सादर केला आहे. त्यानुषंगाने पुढील कार्यवाही कामगार आयुक्त यांच्या स्तरावर चालु आहे.

जानेवारी २०१९ ते डिसेंबर २०१९ या कालावधीचा वार्षिक अहवाल कामगार आयुक्त कार्यालयाने दि.२२/१०/२०२० रोजी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर, बांद्रा, मुंबई यांना सादर केला आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही

---

**मानोरा (जि. वाशिम) तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना २५ हजार रुपये मदत देण्याबाबत**

**(५०) १४०२६ (०७-१०-२०२०). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानोरा (जि. वाशिम) तालुक्यात शेतकऱ्यांनी दुबारा पेरणीसाठी पंचनामे करून प्रत्येक हेक्टरी २५ हजार रुपयांची मदत देण्यात यावी यासाठी दिनांक १३ जुलै, २०२० रोजी वा त्यासुमारास बैलगाडी मोर्चा काढून तसेच दिनांक १ जुलै २०२० रोजी वा त्यासुमारास निवेदन देऊन तहसीलदार मानोरा यांच्याकडे मागणी केली हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदर मागणीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विजय वडेट्टीवार (१९-०१-२०२१) :**

(१) होय,

(२) माहे जून ते ऑक्टोबर, २०२० या कालावधीत अतिवृष्टी व अवेळी पावसामुळे नुकसान झालेल्या बाधितांना दिनांक ०९.११.२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये आर्थिक मदतीचा पहिला हप्ता रू.२२९७०६.३७ लक्ष सर्व विभागीय आयुक्त यांना वितरीत करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.